" स्वराज्याची स्थापना आणि तुकारामाचे विचार - एक चिकित्सक अभ्यास"

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.
सामाजिकशास्त्रे विद्याशाखांतर्गत
पीएच्. डी (इतिहास) पदवीसाठी सादर करावयाचा

संशोधन आराखडा

- संशोधक -

-: महादेव शामराव थोरात :-

एम. ए. बी. एड. एम. फिल.
के. एन. भिसे. आर्टस ॲन्ड कॉमर्स कॉलेज, कुर्डूवाडी,
ता. माढा, जि. सोलापूर,
मो. नं. ९४२०९२१६५,९८८१६५०५६५
ई-मेल : thoratms1977@gmail.com

मार्गदर्शक

प्राचार्य डॉ. राम फुन्ने

स्व. नितीन कला व विज्ञान महाविद्यालय, पाथरी.
जि. परभणी,
मो.नं. ९४२२८९२०५७
ई-मेल : rsfunne@gmail.com

फेब्रुवारी - २०१८

१) प्रास्ताविक :-

तुकाराम-शिवाजी महाराज या दोन्ही व्यक्तिमत्त्वांमध्ये अभ्यासनिहाय असंख्य पैलू आहेत. या पैलूंचा सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक आणि वाङ्मयाच्या दृष्टीने अभ्यास झाल्यास नव्या पिढीला उपयुक्त ठरेल, तत्कालीन काळात काळाच्या पुढे असणारी ही व्यक्तिमत्त्वे आप-आपल्या क्षेत्रामध्ये स्वयंम आहेत. त्यांची विचारधारा, कार्यक्षमता आणि लोकसंग्रहक्षमता थक्क करणारी, दोन्ही व्यक्तिमत्त्वांची क्षेत्रे भिन्न-भिन्न आहेत. तुकाराम अभंग, प्रवचन, किर्तन आणि लोकचर्चा, लोकसहभाग याद्वारे समाजजीवनात मोठे परिवर्तन करताना दिसतात, लोकमनाच्या केंद्रस्थानी आपला प्रभाव निर्माण करतात, लोकांना आपलेसे वाटतात, लोकांच्या हृद्‌याशी माणूसकीचे नाते निर्माण करतात.

अर्थात शिवाजी महाराजांचे क्षेत्र राजकीय आहे. पण मूल्यधिष्ठीत राजकारण आणि सर्वसामान्यांच्या जीवनमानात परिवर्तन करणे हे ध्येय आहे. राजकीय सत्तेचा फायदा मूठभर लोकांना न होता तो सर्वसामान्य लोकांना व्हावा अशी त्यांची धारणा आहे. समाजजीवन अधिक-अधिक उन्नत व स्वयंपूर्ण झाले पाहीजे असे त्यांना वाटत असे. यासाठी त्यांनी तत्कालीन सम्राटांच्या बेबंद राजेशाहीला लोकसहभागातून आव्हान दिले.

तुकाराम-शिवाजी महाराज यांची समाजमूल्य, जीवनमूल्य, कार्यमूल्य आणि सामाजिक ध्येय समान आहे. त्यांना समता, न्याय, स्वातंत्र्य आणि समाजजीवन उन्नत व्हावे असे वाटत होते. याचा नव्याने शोध घेणे आजच्या जीवनासाठी उपयुक्त आहे. या दृष्टीने होणारा अभ्यास इतिहासामध्ये उपयुक्ततावादी मूल्य रुजविण्यासाठी होईल. आजअखेर झालेल्या अभ्यासाचा आढावा घेत-घेत नव्या दृष्टिकोनातून शोध घ्यावा लागेल. या अभ्यासाची उद्दिष्टे समाजउपयोगी अशीच आहेत.

२) अभ्यास विषयाचे महत्व :-

प्रस्तुत विषयावरती आजअखेर संशोधन झालेले नाही. तत्त्कालीन काळात वारकरी संप्रदाय आणि तुकाराम महाराज यांचे विचार जनमानसांच्या आचार, विचार, व्यवहार यांचा आधार होते. याच काळात उदयास आलेले जनसामन्यांचे स्वराज्य हे या विचारापासून दूर असेल असे वाटत नाही. म्हणून स्वराज्याची स्थापना आणि तुकारामांच्या विचाराचा त्यावरील प्रभाव, या अभ्यासाअंती हाती आलेले निष्कर्ष वारकरी संप्रदाय आणि उसनवारी प्रभाव-प्रभव सिध्द करण्यास मदत करतील. यातून सामाजिक ऐक्या, सद्‌भावना या मूल्यांची रूजवणूक आधुनिक काळात करता येईल. कोणत्याही काळात उदयास येत असणारी राजकीय विचारप्रणाली ही त्या-त्या काळातील विचाराच्या मुसीतून जन्माला येत असते. राजकीय विचार प्रणालीच्या मुळाशी असणारे विचार हे सामाजिक व्यवस्थेतून निर्माण होत असते.

३) संशोधन अभ्यासाची उद्दिष्टे :-

१. स्वराज्याच्या स्थापनेचा अभ्यास करणे.

२. तुकारामांच्या विचाराचा अभ्यास करणे.

३. स्वराज्य स्थापनेतील तुकारामांच्या विचाराच्या प्रभावाचा शोध घेणे.

४. तत्कालीन सामाजिक, सांस्कृतिक परिस्थिती बद्दल तुकारामाने शिवाजी महाराजांना दिलेल्या प्रतिक्रियांचा अभ्यास करणे.

५. तुकारामांचे सामाजिक विचार आणि शिवाजी महाराजांचे सामाजिक धोरण यांचा अभ्यास करणे.

६. तुकारामांचे सामाजिक विचार आणि शिवाजी महाराजांचे भाषा विषयक धोरण याची मीमांसा करणे.

४) गृहितके :-

१) संत साहित्य व स्वराज्य स्थापनेचा परामर्श घेणे.

२) तुकारामांच्या विचाराची दृष्टी तपासणे.

३) स्वराज्य स्थापनेसाठी तुकारामांच्या विचाराचा आधार शोधणे.

४) तुकाराम-शिवाजी महाराज यांचे समग्र समाज परिवर्तनाचे उद्दिष्ट होते याचा अभ्यास करणे.

५) शिवाजी महाराज स्वराज्याची स्थापना बहुजनांसाठी करत होते याचा शोध घेणे.

५) संशोधन पध्दती :-

प्रस्तुत संशोधन हे प्राथमिक व दुय्यम साधन सामग्रीवर आधारित आहे. त्यामध्ये वर्तमानपत्र, तुकारामगाथा, मासिके, संदर्भग्रंथ, राज्यभाषा व्यवहारकोष यांचा प्रामुख्याने अवलंब करणार आहे.

६) संशोधनासाठी कालमर्यादा :-

प्रस्तुत संशोधनासाठी १२ व्या शतकापासून १६ व्या शतकापर्यत संदर्भ साधनांचा उपयोग करावयाचा आहे.

७) भौगालिक मर्यादा :-

प्रस्तुत संशोधनाची भौगोलिक मर्यादा ही महाराष्ट्र राज्यपुरतीच मर्यादित आहे.

८) प्रकरण रचना :-

१. प्रस्तावना आणि संशोधन पध्दती.

२. तुकाराम आणि शिवाजी महाराज यांचा कालखंड.

३. सोळव्या शतकातील महाराष्ट्रातील सामाजिक, सांस्कृतिक राजकीय आणि धार्मिक स्थिती.

४. तुकारामाचे सामाजिक, धर्मविषयक विचार आणि शिवाजी महाराजांचे सामाजिक, धर्मविषयक धोरण

५. तुकारामाचे शेतीविषयक, भाषाविषयक विचार व शिवाजी महारांजाचे धोरण

६. स्वराज्याची स्थापना आणि तुकारामाचे विचार.

७. निष्कर्ष

प्रकरण पहिले

“प्रास्ताविक आणि संशोधन पद्धती”

प्रस्तुत प्रबंधाच्या पहिल्या प्रकरणामध्ये संशोधन विषयाचे म्हणजेच शिवाजी महाराज यांच्या ‘स्वराज्य’ संकल्पनेचा अर्थ, व्याख्या स्पष्ट करावयाची आहे व स्वराज्याचे स्वरुप या प्रकरणात अभ्यासावयाचे आहे.

१६ व्या शतकातील सामाजिक, राजकीय परिस्थितीचा सूक्ष्म अभ्यास करावा लागेल. यातूनच तत्त्कालीन काळातील राजकीय विचारप्रणालीचा शोध घेता येईल. १२ व्या शतकात उदयास आलेला वारकरी संप्रदाय आणि त्याचा समाजजीवनातील प्रभावाचा शोध घ्यावा लागेल. या अभ्यासामध्येच 'स्वराज्य' निर्मितीची प्रक्रिया सामाविष्ठ आहे.

समाज जीवनांत निर्माण झालेल्या समस्या, त्या समस्यांनी ग्रासलेला सर्वसामान्य माणूस हा नव्या राजकीय जीवनाच्या अपेक्षा उराशी बाळगताना दिसतो. या सामाजिक प्रक्रियेतून स्वराज्याची निर्मिती होते. असे म्हणण्यास खूप वाव आहे.

मुघलांच्या राजवटीतील अराजकता आणि सर्वसामान्यांचे होणारे शोषण या गोष्टींचा विचार करता सामान्य लोक नव्या राजकीय नेतृत्वाची अपेक्षा मनाशी बाळगत होते. याबाबत मतभिन्नता होण्याचे कारण नाही. कारण मुघलांची राजकीय सत्ता असतानासुध्दा धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक जीवनावर महाराष्ट्रामध्ये धर्मसंस्थेचा प्रभाव होता. मुघलांनी या क्षेत्रामध्ये हस्तक्षेप केलेला नाही. या गोष्टी नव्या इतिहासाच्या अभ्यासकांच्या दृष्टीने महत्वाच्या आहेत. मुघलांच्या राजकीय सत्तेला समग्र व संघटीतपणे विरोध झाला नाही या कारणांचा शोध घेता येईल आणि तसेच संशोधन पद्धतीचा अभ्यास देखील या प्रकरणात करण्यात येईल.

प्रकरणाच्या शेवटी निष्कर्ष नोंदवून प्रकरण पूर्ण केले जाणार आहे.

प्रकरण दुसरे

"तुकाराम-शिवाजी महाराज कालखंड"

अभ्यासाची मर्यादा निश्चित करण्यासाठी कालखंड निश्चित करणे महत्त्वाचे असते. कालखंडाच्या मर्यादेत राहून संशोधनाची व्यापकता वाढविणे महत्त्वाचे आहे. तुकाराम-शिवाजी महाराज यांचा कालखंड एकाच शतकातील असला तरी जन्म-मृत्यू तिथीच्या बाबतीत निर्माण झालेला संभ्रम संशोधन साधनाच्या साहाय्याने सोडविणे महत्त्वाचे आहे. १६ व्या शतकातील सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, धार्मिक आणि साहित्यिक स्थितीचा शोध प्रस्तुत प्रकरणात घेण्यात येईल. दोहोंचा कालखंड कारकिर्दीनुसार निश्चित केला जाईल.

१) तुकारामांचा जन्मकाळ

२) शिवाजी महाराजांचा जन्मकाळ

३) स्वराज्य निर्मितीचा पूर्वकाळ व उत्तरकाळ

४) वारकरी संप्रदायातील तुकारामांचा पूर्वकाळ व उत्तरकाळ

प्रस्तुत, प्रकरणाची मांडणी अशा स्वरुपात करता येईल. सविस्तर विचार अभ्यासाअंती होईल.

प्रकरण तिसरे

"तुकारामांचे सामाजिक विचार आणि शिवाजी महाराजांचे सामाजिक धोरण"

तुकारामांचे सामाजिक विचार थक्क करणारे आहेत. त्यांनी मांडलेले समतेचे, लोक कल्याणाचे विचार कमालीच्या समतेवर आधारित आहेत. आधुनिक लोकशाहीत प्रतिबिंबित झालेली मूल्य तुकारामांच्या विचारात स्पष्टपणे आढळतात.

शिवाजी महाराजांच्या राजकीय धोरणातून लोककल्याणकारी लोकशाही विचारांचीच जोपसना झाली. या गोष्टीचा सखोल मागोवा घेता येईल.

तुकारामांचे सामाजिक विचार सर्वसामान्याच्या हिताचे होते, पण तत्कालीन मुघल सत्ता, वतनदार, जमीनदार आणि सरदाराच्या हिताचे रक्षण करण्यात मग्न होती. राजाला देव मानणारी विषमता वादी राजकीय सत्ता या मुळे सर्वसामान्याच्या दुःखाने दुःखी होणारा, त्यांचे दुःख नाहीसे करणारा कुणीही व्यक्ती साधू अथवा देव आहे असे म्हणणारे तुकाराम यांचे विचार परस्पर टोकाचे आहेत. या दृष्टीने उदाहरणा दाखल तुकारामांचा पुढील अभंग महत्वपूर्ण आहे.

'जे का रंजले गांजले। त्यासि म्हणे जो आपुले।।
तोचि साधू ओळखावा । देव तेथेच जाणावा।।
मृदू सबाह्य नवनीत । तैसे सज्जानाचें चित्त।।
दया करणें जे पुत्राशी। तेचि दास आणि दासी।।
तुका म्हणे सांगू। तोचि भगवंताची मूर्ती।। (३४७)

तुकारामांच्या या विचाराचा प्रत्यक्ष शिवाजी महाराजांच्या राजकीय, सामाजिक विचारातून आणि कृतीतून आल्याचे आपणास जाणवते. सर्वसामान्याच्या 'स्वराज्य' निर्मितीची प्रेरणा शिवाजीमहाराज तुकारामांच्या कडून घेतात हे यावरून स्पष्ट होते.

१. तुकाराम शिवाजीमहाराज व्यापक समाज जीवनाचा विचार करतात.

२. तुकाराम सामाजिक बदलासाठी प्रयत्न करतात.

३. शिवाजी महाराज सामाजिक समतेसाठी प्रयत्न करतात.

४. तुकाराम वैचारिक भूमिकेतून प्रबोधन, प्रयत्न करत आहेत.

५. शिवाजी महाराज राजकिय सुधारणेच्या माध्यामातून प्रयत्न करत आहेत.

प्रकरण चौथे

"तुकाराम - शिवाजी महाराज यांचे धर्मविषयक विचार"

तुकाराम - शिवाजीमहाराज यांचे धर्मविषयक विचार रूढार्थाने प्रचलित असणाऱ्या धर्म विचाराप्रमाणे असल्याचे जाणवत नाही. रूढ चाकोरी पलीकडील धर्म या दोहोंनी स्वीकारला. त्यांच्या धर्मविचाराचा गाभा मानव केंद्रीत होता. मानवाच्या उन्नतीचा, प्रगतीचा आणि लोककल्याणाचा धर्म त्यांनी स्वीकारला. धर्मग्रंथ, पुरोहितशाही, कर्मकांड यामध्ये अडकणारा धर्म तुकारामांना मान्य नव्हता. तर शिवाजीमहाराजांनी अशा धर्मांना केव्हाही खत पाणी घातले नाही, त्याच्या धर्मविषयक विचारांचा शोध घेताना असंख्य बाबी नव्याने पुढे येतील या गोष्टीचा उपयोग धर्माच्या क्षेत्रात नव्याने निर्माण झालेल्या समस्या सोडविण्यासाठी होतील. कारण समाजाचा प्रभाव केंद्रस्थानी असणारी व्यक्ती जर धर्मनिरपेक्ष लोककल्याणाचा धर्म जोपासत होती. तर समाज जीवन या मुल्यांवर निर्माण करता येईल. यातूनच -

१) तुकाराम - शिवाजी महाराज मानवतेचा धर्म मानतात.

२) रूढी, परंपरा आणि पोथीनिष्ठ धर्म दोघानीही नाकारला.

३) धर्माची मक्तेदारी नाकारून समतेचा नवा धर्म सांगितला.

४) धर्मकेंद्री विचार न मांडता मानवी प्रगतीचा धर्म सांगितला.

प्रकरण पाचवे

“तुकारामांचे शेतीविषयक विचार आणि शिवाजी महाराजांचे धोरण”

तुकाराम हे स्वतः शेतकरी कुटूंबात जन्माला आले होते. त्यांच्या अभंगाच्या गाथेमध्ये स्वतंत्रपणे शेतीविषयी शेकडो अभंग येतात. तुकारामांची शेतीविषयक व शेतकऱ्याविषयची जाणिव व्यापक होती. शेतकऱ्यांचे दैनंदिन जीवन आणि राजसत्तेकडून होणारे शोषण याबाबत दु:ख व्यक्त केले आहे. तसा राग सुध्दा व्यक्त केला आहे या बाबी महत्वपूर्ण आहे.

तुकारामांप्रमाणे स्वतः शिवाजीमहाराज शेतकरी कुटूंबातील होते. त्यांच्या आयुष्यातील सार्वजनिक जीवनाची सुरूवात पुण्यात शेती नांगरण्याच्या प्रसंगाने होते. पुढे स्वराज्यातील हजारो मावळेसुध्दा शेतकऱ्यांचीच मुले असताना दिसतात. हा योगायोग नव्हे तर शिवाजी महाराजांना शेतकऱ्यांच्या जीवनात बदल घडवायचा होता, बी-बियाणे, जनावरे शेतकऱ्यांना पुरविण्याचे धोरण, पिकाची पाहणी करून शेतसारा घेण्याची पद्धत, वतनदारी, जमिनदारी पध्दती नष्ट करणे यातून त्यांचे शेती विषयक धोरण स्पष्ट होते याचा शोध या प्रकरणात घ्यावयाचा आहे.

- शेती हा पारंपरिक दोहोंचाही व्यवसाय.
- असंख्ये बारीक-सारिक गोष्टींचा तपशील शेतीच्या संदर्भात येतो आहे.
- तुकाराम शेतकऱ्यांचे जीवनमान अभंगातून मांडतात.
- शिवाजी-महाराज शेतकऱ्यांचे जीवनमान सुधारण्यासाठी कायदे करतात.

प्रकरण सहावे

“तुकारामांचे भाषाविचार आणि शिवाजीमहाराजांचे भाषिक धोरण”

तुकारामांनी भाषेच्या बाबतचे विचार आपल्या अभंगातून वारंवार मांडलेले आहेत. भाषा हे अभिव्यक्तीचे प्रभावी माध्यम आहे. भाषेचा समर्पक वापर करणे जीवनाला यशस्वी, आनंददायी बनविण्यासाठी महत्वाचे आहे. समाज प्रबोधनाचे प्रभावी माध्यम भाषा आहे. भाषेवर धर्मवाद्यांनी मक्तेदारी सांगितली. मागील कारण लक्षात घेता भाषा हे स्वतंत्र व्यक्तिमत्व निर्मितीचे साधन आहे. कोणतीही व्यवस्था निर्मितीच्या केंद्रस्थानी भाषा हे साधन असते, या बाबीचा विचार करता तुकारामांचे भाषा विषयक विचार आणि शिवाजी महाराजांनी राज्यव्यवहारासाठी निर्मिलेला "राज्यभाषाव्यवहार कोष" या गोष्टीचा चिकित्सक अभ्यास करता येईल.

- भाषा अभिव्यक्तीचे साधन आहे.
- तुकाराम शब्दाला शस्त्र, धन, यज्ञ इ. मानतात.
- शिवाजी महाराज भाषा , शब्द शुध्दीचे धोरण स्वीकारतात.
- भाषेवर प्रभुत्व त्याचा समाजावर प्रभाव असतो हे दोघानाही मान्य होते.

प्रकरण सातवे

“उपसंहार”

वरील सर्व प्रकरणातून हाती आलेले निष्कर्ष या प्रकरणात नोंदविले जातील.

- **टीप :- अभ्यासाअंती आराखड्यात बदल होण्याची शक्यता आहे.**

९) संबंधीत साहित्याचा आढावा :-

९.१ डॉ. जाधव सविता "तुकारामांच्या प्रभावळीची कविता"

प्रस्तुत संशोधनामध्ये सविता जाधव म्हणतात, तुकारामांची कविता वारकरी संप्रदायाच्या विचारावरती पोसलेली आहे. इतकेच नाही तर तत्कालिन काळातील सामाजिक सांस्कृतिक आणि विचाराचे संदर्भ सुध्दा प्राप्त झालेले आहेत.

९.२ डॉ. गवळी अनिल "सर्वात्मभावे तुकाराम"

प्रस्तुत संशोधनामध्ये तुकारामाच्या साहित्याचा व विचाराचा प्रभाव तत्कालीन काळात सर्व क्षेत्रांच्या वरती व्यापक प्रमाणावरती जाणवतो असे त्यांनी म्हटले आहे. तुकारामांचे साहित्य स्वअनुभवावरती व सामाजिक समतेच्या विचारावरती आधारलेले आहे. त्यांच्या विचारातून तत्कालिन काळात असंख्य घटकांनी प्रेरणा घेतली.

९.३ डॉ. साळुंखे आ. ह. "विद्रोही तुकाराम"

प्रस्तुत संशोधनात तुकारामांनी अन्यायाच्या विरोधामध्ये केलेला संघर्ष सामाजिक, समता, न्याय, बंधुत्व या मुल्यांच्या दृष्टिकोणातून केले असलाचे म्हटले आहे. सामाजिक अन्यायाच्या विरोधामध्ये विचार मांडणारे तुकाराम आणि सामाजिक अन्यायाच्या विरोधात लढणारे शिवाजी महाराज यांच्या तत्वज्ञानाचा धागा समान असल्याची नोंद लेखकाने केली आहे.

९.४ डॉ. साळुंखे आ. ह. "तुकारामांचा शेतकरी"

प्रस्तुत संशोधनात तुकारामांनी स्वअनुभवातून शेतकऱ्यांचे जीवन नोंदवलेले आहे. तत्कालीन काळीतल रिती-रिवाज, सांस्कृतिक जीवन, राज्यव्यवस्था यांचे प्रतिबिंब तुकारामांच्या काव्यात उमटलेले आहे.

९.५ पंडीत विष्णुशास्त्री(संपा) "श्री तुकाराम बाबांच्या अभंगाची गाथा"

तुकारामांच्या अभंग गाथेमध्ये सुमारे साडेचार हजार अभंग समाविष्ठ आहेत. हे अभंग तत्कालिन समाजजीवनातील सर्व पैलुंना स्पर्श करतात. या अभंगावरती वारकरी संप्रदायाच्या विचाराचा प्रभाव आहे. तुकारामांच्या विचारातून तत्कालीन काळातील लोकजीवनाला प्रभावित केले आहे.

९.६ डॉ. कोलारकर, श. गो. "मराठ्यांचा इतिहास"

प्रस्तुत ग्रंथात मराठी शाहीचा उदय, विकास , शिवाजी महाराजांचे धोरण आणि तत्कालीन काळातील सामाजिक, राजकीय , सांस्कृतिक, आर्थिक, पार्श्वभूमीचा आढावा घेतला आहे.

९.७ देशमुख मा. म. "मध्ययुगीन भारताचा इतिहास"

प्रस्तुत ग्रंथामध्ये लेखकाने स्वराज्य स्थापनेची प्रेरणा छत्रपतींना वारकरी संप्रदायाच्या विचारातून मिळाली असल्याचे नोंदवतात. शिवाजी महाराज साम्राज्य विस्तारापेक्षा सर्वसामान्याचे स्वराज्य निर्मितीसाठी - सातत्याने प्रयत्न करताना दिसतात.

९.८ बेंद्रे, वा. सी. "संत तुकाराम चरित्र, कवित्व आणि तत्त्वज्ञान"

तुकारामांच्या विचाराचा प्रभाव जनसामान्याच्या जीवन मूल्यावरती झाला. यातूनच स्वराज्याची संकल्पना महाराष्ट्रामध्ये उदयास आली. सर्वसामान्यांच्या सुखी जीवनाचे स्वप्न वारकरी संप्रदायांनी तत्त्वज्ञानाच्या पातळीवरती पाहिले तर स्वराज्य निर्मितीने ते राजकीय पातळीवरती सत्यात उतरविले.

संदर्भग्रंथ सूची

गाथा / ग्रंथावली :-

१. जोशी, प्र. न. (संपा)	:	१९६६,६८,६९ सार्थ तुकाराम गाथा, खंड - १, २, ३ श्री भारत बुक डेपो, मुंबई, प्रथमावृत्ती
२. पंडित, विष्णूशास्त्री (संपा.)	:	१९९१ श्री. तुकारामबाबांच्या अभंगाची गाथा, महाराष्ट्र शासन, मुंबई, द्वितीय पुनर्मुद्रण
३. पांगारकर, ल. रा. (संपा)	:	१९७१ श्री. संततुकारामगाथा, विदर्भ मराठवाडा बुक कंपनी, पुणे, प्रथमावृत्ती
४. नेरूरकर, सं. के.(संपा)	:	१९८२ श्री. तुकाराम महाराजांची सार्थ गाथा, दांडेकर सांस्कृतिक प्रकाशन, पुणे,
५. साखरे, नाना महाराज	:	१९८३ श्री. तुकाराम गाथा, वरदा प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती
६. दास, श्यामसुंदर	:	२००८ कबीर ग्रंथावली, नागरी प्रचारिणी सभा, नई दिल्ली, संस्करण
७. मिश्रा, भागवत	:	१९८७ कबीर ग्रंथावली, अनुपम प्रकाशन, पटना, द्वितीयावृत्ती
८. बेंद्रे, वा.सी.	:	१९६३ श्री. छत्रपती शिवाजी महाराज, नॅशनल बुक ट्रस्ट ऑफ इंडिया, दिल्ली प्रथमावृत्ती
९. शेजवालकर, यं. शं.	:	१९६३ श्री. शिव छत्रपती - संकल्पित शिवचरित्राची प्रस्तावना आराखडा व साधने, पॅप्युलर प्रकाशन, मुंबई, पाचवी आवृत्ती

१०. ग. ह. खरे आणि कुलकर्णी	**:**	१९८६ मराठ्यांचा इतिहास खंड - १, २, पॅप्युलर प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती
११. पवार, जयसिंगराव	**:**	१९९३ मराठी सत्तेचा उदय मराठेशाहीचा मागोवा, अजब प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती
१२. कुलकर्णी, अ. रा.	**:**	१९८४ शिवकालीन महाराष्ट्र, कॉन्टिनेटल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती
१३. गायकवाड, सरदेसाई	**:**	१९९० मराठे कालीन संस्था व विचार, अजब प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती
१४. राजवाडे, वि. का.	**:**	१९७५ मराठ्यांच्या इतिहासाची साधने, राजहंस प्रकाशन, पुणे
१५. इर्लेकर, सुहासिनी	**:**	१९९० तुकारामांची प्रभावळ, बेलवलकर प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती
१६. केळकर, श. ग.	**:**	१९९७ मराठ्यांचा इतिहास, मंगेश प्रकाशन, नागपुर
१७. देशमुख, मा. म.	**:**	१९९१ "मध्ययुगीन भारताचा इतिहास" सुगावा प्रकाशन

संशोधक	**मार्गदर्शक**
(श्री.महादेव शामराव थोरात)	(प्राचार्य डॉ.राम फुन्ने)